भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र.६०४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २९/०८/२०१७

**१) कॅमेऱ्याची चोरी. :—**

दिनांक २३+२४/०८/२०१७ चे १७.४५ ते ०७.०१ वा. पर्यंत यातील फिर्यादी बालाजी संभाजी कदम वय २८ वर्ष, रा. कोका वन्यजीव चंद्रपुर वनरक्षक यांचे ढिवरवाडा बिट क्रमांक १६२ मध्ये जंगलात खैराच्या झाडाला एक कन्डीबॅग ट्रॅप कॅमेरा क्रमांक सी. के. ४००२१४९ चा किमती १५,८००/—रु. चा बसविलेला कुणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे. करडी येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. नंदेश्वर पो.स्टे करडी हे करीत आहेत.

**२) शाळेची बस हयगयीने चालवुन एसटी बसला धडक दिल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २८/०८/२०१७ चे ०७.१५ वा. दर. यातील फिर्यादीने विजय बारकु बांगर वय ४७ वर्ष, रा. काजीनगर भंडारा यानी विद्यार्थी घेणेकरीता शास्त्री नगर वरठी रोडवर जाणाऱ्या एसटी बस क्र. एमएच ४० एक्यु ६१२८ थांबविली असता यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील सेन पिंटर बस हयगयीने चालवुन एसटी बसच्या मागच्या काचाला धडक फोडल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे. भंडारा येथे कलम २७९ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. फटींग पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**३) ट्रेलरची कारला धडक लागुन कारचे नुकसान केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २८/०८/२०१७ चे २०.३० वा. दर. यातील फिर्यादी रमेश ढेंकल शेंडे वय ३७ वर्ष, रा. मुढरी बुज हा आपले आयटेन कार क्रमाक एमएच ३६ एच १८२५ ने दाभा कडुन भंडारा कडे येत असता भंडारा कडुन येणाऱ्या आरोपी चालकाने आपले ताब्यातील ट्रेलर हयगयीने, भरधाव वेगाने चालवुन फिर्यादीचे कारला धडक मारुन कारचे नुकसान केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे २७९ भादंवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. फटींग पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**४) घरात प्रवेश करुन महिलेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २८/०८/२०१७ चे २०.३० वा. दर. यातील फिर्यादी ही आपले घरी स्वंयपाक खोलीत स्वंयपाक करीत असतांना यातील आरोपीने घरात प्रवेश करुन स्वंयपाक खोलीत जावुन फिर्यादीस तुझ्यावर असलेले उधारीचे ८०/—रु. दे असे बोलुन विनयभंग करुन मारपीट केल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे ३५४(१))२),४५२,३२३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पो.स्टे कारधा हे करीत आहेत.

**५) रात्रीचे अंधारात आपले अस्तित्व लपवुन दखलपात्र गुन्हा करण्याच्या उदद्शाने मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :—**

**अ)** दिनांक २८/०८/२०१७ चे ०१.३० ते ०१.५० वा. दर. यातील आरोपीने सुर्यास्त व सुर्योदया दरम्यान अंधारात आपले अस्तित्व लपवुन दखलपात्र गुन्हा करण्याच्या उदेशाने मिळुन त्यास येण्याचे कारण विचारले असता उडवा उडविचे उत्तर दिल्याने सरतर्फे फिर्यादी पोशि. डोरले यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे १२२(ब)मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. दुधकवरे पो.स्टे भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

ब) दिनांक २८/०८/२०१७ चे ०२.३० ते ०३.१५ वा. दर. यातील आरोपीने सुर्यास्त व सुर्योदया दरम्यान अंधारात तोंडाला कापड बांधुन आपले अस्तित्व लपवुन दखलपात्र गुन्हा करण्याच्या उदेशाने मिळुन त्यास येण्याचे कारण विचारले असता उडवा उडविचे उत्तर दिल्याने सरतर्फे फिर्यादी पोशि. बन्सोड यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे १२२(ब)मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. दुधकवरे पो.स्टे भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**६) नायलॉन दोरीने गळफास लावुन इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक २८/०८/२०१७ चे ०८.०० वा. दर यातील फिर्यादी हा आपले शेतावर पाणी पाहण्यास गेला असता त्याला बांधीतील कचरा काढतांनी करंजीचे झाडाच्या फांदीवर पिवळया नायलॉन दोरीने गळफास लावुन अज्ञात अनोळखी पुरुष इसम वय अंदाजे ५५ वर्ष, हा मरण पावल्याचे आढळुन आल्याने फिर्यादी भारत बाबुलाल कटरे वय ४० वर्ष, रा. हरदोली यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. डोंगरे पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**७) अवैध दारु अडयावर धाडी . :–**

दिनांक २८/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे करड व लाखांदुर येथे दारू अडयावर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून आरोपीताच्या ताब्यातुन १५ लिटर हातभटटी दारु किंमती ७५०/–रु. ९ लिटर ९०० मिली लिटर विदेशी देशी दारु किंमती ११०००/–रु. असा एकुण किमती ११७५०/रु चा माल जप्त करण्यात आला आहे.

**८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक २८/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १३६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली आहे त्यापैकी अवैध प्रवासी ०२, तीन सिटर वाहनांवरती १६ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ११८ केसेस करण्यात आलेल्या आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत,** संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.